ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष १० | पुणें, बुधवार तारीख १ सप्टेंबर, १९५४ | अंक ३४

## विविध माहिती

**टोळधाडीविरुद्ध मोहीम**—पाकिस्तानमधून येणाऱ्या टोळांच्या थव्यांनीं नागपूर, जोधपूर, जेसलमीर, इत्यादि भागांत अंडीं घालण्यास सुरवात केल्याची बातमी आहे. टोळांच्या ह्या आक्रमणामुळें सुमारें २०० खेडेगांवाजवळील ४०,००० एकर जमिनींतील पिकांना धोका उत्पन्न झाला आहे. विमानांच्या मदतीनें टोळांच्या उत्पत्तीचा नाश करण्याचे प्रयत्न जारीनें चालू आहेत.

**मजूर-संघटनेची विकास कर्जाला मदत**—ग्लॅक्सो लॅबोरेटरिज लि. ह्या कंपनीच्या मजूर-संघटनेनें राष्ट्रीय-योजना-कर्जाचे ३,००० रुपयांचे रोखे घेण्याचें ठरविलें आहे. युनिअनच्या नेहमींच्या फंडांतूनच रोख्यांची किंमत देण्यांत येणार आहे.

**विंध्य-प्रदेशांत शिक्षकांची भरती**—विंध्य प्रदेशांतील सुशिक्षितांत माजलेल्या बेकारीवर उपाययोजना म्हणून राज्य-सरकारनें १,२०० शिक्षकांची भरती करण्याची एक योजना भारतीय सरकारच्या मंजुरीसाठीं धाडली होती. ह्या योजनेला मध्यवर्ती सरकारनें मान्यता दिली असल्याचें समजतें.

**दिल्ली येथील गांधीजींचा पुतळा**—जुन्या दिल्ली स्टेशन-समोर म. गांधींचा ९ फूट उंचीचा ब्रॉंझ पुतळा दिल्ली म्युनिसिपालिटी २ ऑक्टोबर रोजीं उभारणार आहे. हा पुतळा तयार करण्याचें काम मुंबईचे शिल्पकार श्री. एस. डी. साठे ह्यांना मिळालें आहे. इतर तीन पुढाऱ्यांचे पुतळे करण्याचें काम दिल्ली म्युनिसिपालिटीनें त्यांनाच दिलें आहे.

**आंध्रांत नवा कारखाना**—आंध्र राज्यांतील गुंतूर जिल्ह्यांत सोडा ॲश तयार करण्याचा एक नवा कारखाना उभारण्याचा भारतीय सरकारचा बेत आहे. ह्या कारखान्यासाठीं ६ कोटी रुपये भांडवल लागेल. कारखाना विशाखापट्टम् येथें उभारण्यांत यावा, अशी राज्य सरकारची इच्छा होती. पण गुंतूर जिल्ह्यांत आवश्यक त्या कच्च्या मालाची विपुलता असल्यानें विशाखापट्टमला मान्यता देण्यांत आली नाहीं.

**राष्ट्रीय विकास कर्जाला मदत**—स्त्रियांच्या अल्प बचतीच्या योजनेतर्फे राष्ट्रीय विकास कर्जाचे १ लाख रुपयांचे रोखे हैद्राबादच्या निजामानें घेतले आहेत, असें समजतें.


# राष्ट्रीय नियोजन कर्जामध्यें

## सढळपणें रक्कम गुंतवा

हें कर्ज

★ राष्ट्रीय विकास योजनासाठीं उपयोगिलें जाणार आहे.
★ राष्ट्राच्या भविष्यकाळावरील विश्वासाचें प्रतीक आहे.
★ राष्ट्राच्या भवितव्यावर असलेल्या जनतेच्या विश्वासाची घोषणा होय.

## लक्षांत ठेवा

हें कर्ज ता. १६ सप्टेंबर रोजीं बंद होत आहे.

भारताच्या भविष्यांत पैसा गुंतवा

## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., पुणें

अहवालाचे सालांत बँकेचा व्यवहार १४ शाखा नि ४ उपशाखा यांचेमार्फत चालू होता. बँकेस जोडलेल्या सहकारी पतपेढ्यांची संख्या सालअखेरीस ७४२ होती. मतवर्षी ती ७१५ होती.

### पीककर्जांत वाढ

बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँकेनें ठरविलेल्या धोरणानुसार शेती कर्जव्यवस्था चालू असल्यानें पीककर्जाच्या रकमेंतहि वाढ होत आहे. गेल्या तीन वर्षांचे आंकडे माहितीसाठी खालीं दिले आहेत:—

| | |
|---|---|
| दिनांक ३०-६-५२ अखेर | रु. ४७,०६,२२९ |
| दिनांक ३०-६-५३ अखेर | रु. ४९,८१,०३२ |
| दिनांक ३०-६-५४ अखेर | रु. ६०,०६,९२९ |
| पीककर्जाची येणें बाकीपैकी थकबाकी | रु. १६,२१,१२२ |

वरील थकबाकी मागील वर्षापेक्षा रु. १,१८,५८० नें जास्त आहे. याचें एक कारण म्हणजे सन १९५२ प्रमाणेंच सन १९५३ सालींहि कांहीं भागांत दुष्काळ पडला हें होय. चालू वर्षी सर्वत्र पाऊस चांगला झाला असल्यानें वरील थकबाकी वसूल होईल असा विश्वास वाटतो. पीक कर्जांत होणारी वाढ स्वाभाविकच आहे. परंतु पीक कर्जयोजनेनुसार पिकाचे विक्रींतून कर्जाची फेड व्हावी, हा हेतु मात्र अद्याप व्हावा तितका सफल झालेला नाहीं. याबाबत विशेष प्रयत्न चालू आहेत.

### बटाटा कर्जयोजना

गेलीं दोन वर्षें चालू असलेली बटाटा कर्जयोजना पुणें जिल्हा खरेदी-विक्री संघामार्फत अहवालाचे सालींहि चालू होती. अहवालाचे सालीं बटाटा कर्जाची मर्यादा दर एकरीं रु. ४०० वरून रु. ६०० पर्यंत वाढविण्यांत आली होती. त्यामुळें साहजिकच सोसायट्यांच्या सभासदांची बटाटाबियाणें व मिश्रखत यांची गरज पूर्णपणें भागली गेली. चालू सालीं ५६ सोसायट्यांच्या १०१३ सभासदांना १,०९२ एकर क्षेत्रासाठीं बँकेनें रु. ५,७०,१३० चें कर्ज मालाचे रूपानें पुरविलें. बारामती भागांतहि उसाकरितां निरा कॅनॉल सहकारी संघामार्फत मालाच्या रूपानें कर्ज पुरविण्याची व्यवस्था चालू आहे.

शेतकऱ्यांच्या शेतीविषयक गरजा भागविण्याचे दृष्टीनें रिझर्व्ह बँकेकडून अहवालाचे सालासाठी रु. ३५ लाखांचें कर्ज मंजूर करण्यांत आलें होतें. त्यापोटीं रु. ३० लाखांपर्यंत उचल करण्यांत आली होती.

### चांदीच्या ढाली

बँकेनें सहकारी सुवर्णमहोत्सवास रु. १०००।- ची देणगी देऊन शिवाय चांदीच्या दोन ढाली तयार करून त्यांपैकी एक शेतकी सोसायटीस व एक बिगर शेतकी सोसायटीस तिनें प्रतिवर्षी केलेल्या कामगिरीचें प्रतीक म्हणून देण्यासाठी फिरत्या स्वरूपांत ठेविल्या, त्या पाटस को. क्रेडिट सोसायटी ( दौण्ड तालुका ) व कॉसमॉस को. अर्बन बँक लि. पुणें या संस्थांना सन १९५४-५५ अखेर त्यांजकडे ठेवण्यासाठीं देण्यांत आल्या.

गेल्या वर्षापेक्षाहि अहवालाचे सालीं ठेवींमध्यें सुमारें चार लाखांची वाढच झाली आहे.

अहवालाचे सालांत बँकेस निव्वळ नफा रु. ९०,४७५-१९-० झाला. ६% डिव्हिडंड वाटण्यांत येईल.

## जमाखर्चाची द्विनोंद पद्धति : भाग १ ला

( लेखक : प्रो. ह्या. कानिटकर., बी. कॉम., एलएल. बी., व्यापारविभागप्रमुख, राजापुर हायस्कूल, राजापूर. व्हीनस प्रकाशन, पुणें २. पृ. सं. ३६७. किं. ६ रु. )

'जमाखर्चाची द्विनोंद पद्धति' ह्या पुस्तकाचा हा पहिला भाग असून, लवकरच दुसरा भाग प्रसिद्ध करण्याचा लेखकाचा निश्चय आहे. प्रस्तुत पहिल्या भागाच्या पहिल्या विभागांत ( १ ) मूलतत्त्वें ( २ ) जमाखर्च व जमाखर्चाची पद्धति ( ३ ) आर्थिक व्यवहारांची कच्ची नोंद व पृथःकरण ( ४ ) खातें व खात्यांचे प्रकार ( ५ ) जमा-नांवेचे नियम ( ६ ) रोजकीर्द ( ७ ) खतावणी ( ८ ) तेरीज ( ९ ) तेरजांचे प्रकार ( १० ) जमवाजमवीच्या व अखेरच्या नोंदी व ( ११ ) खात्यावरील शिल्लक ओढणें, अशीं अकरा प्रकरणें असून दुसऱ्या विभागांत ( १ ) तेरीज न जमलें तर ( २ ) खरेदी-विक्री खातें ( ३ ) निर्मितिखातें ( ४ ) नफातोटाखातें ( ५ ) निधि व ( ६ ) ताळेबंद. अशीं सहा प्रकरणें आहेत आणि अखेरीस पारिभाषिक शब्दांची यादी ( मराठी-इंग्रजी व इंग्रजी-मराठी ) आणि सूची देण्यांत आली आहे.

इंग्रजींत या विषयावर पुष्कळच पुस्तकें आहेत. सदर विषय इतक्या विस्तृतपणें मराठींत लिहिण्याचा श्री. कानिटकर यांचा हा उपक्रम जवळजवळ प्रथमचाच आहे असें वाटतें. सदर पुस्तकांत द्विनोंद पद्धतीनें जमाखर्चाचें प्राथमिक विवेचन सुलभ भाषेंत, विद्यार्थ्यांना सहज कळेल या रीतीनें केलें असून, विषयाची मांडणी उदाहरणें देऊन केल्यामुळें पाठ्यपुस्तक म्हणून या पुस्तकाचा खचित उपयोग होईल. प्रथमचाच प्रयत्न या दृष्टीनें लेखकाचा हा उपक्रम स्वागतार्ह आहे. द्विनोंद जमाखर्चाच्या पद्धतीचें प्रवेशपुस्तक या दृष्टीनें सदर पुस्तक मराठी पाठ्यपुस्तकांत उत्कृष्ट भर आहे यांत शंका नाहीं. मराठी प्रतिशब्द योजण्याचें काम अर्थात् अवघड आहे आणि दुसरे प्रतिशब्द सुचविणें शक्य होईल. उदाहरणार्थ, कीर्दींत व खतावणींत इंग्रजींतील To व By या उपपदांचे 'कडून' व 'कडे' हे प्रतिशब्द जरा क्लिष्ट वाटतात; त्यांऐवजीं 'नांवें' व 'जमा' ही शब्दयोजना बरी दिसेल.

द. गो. आपटे
बी. ए., जी. डी. ए., एफ्. सी. ए. चार्टर्ड अकौंटंट

---

### उसाचा उत्पादनखर्च किती !

मध्यवर्ती व कांहीं राज्य सरकारें साखर कारखान्यांना किती किंमतीस ऊंस विकण्यांत यावा, हें ठरवून देतात. परंतु भारतांतील वेगवेगळ्या परिस्थितींत उसाला उत्पादनखर्च प्रत्यक्ष येतो किती, ह्या महत्त्वाच्या प्रश्नाकडे पुरेसें लक्ष देण्यांत आलेलें नाहीं. उसाच्या पिकाबाबत विश्वासार्ह तपशीलवार माहिती सहजीं उपलब्ध होत नाहीं, हें त्याचें कारण आहे. साखरेच्या एकूण उत्पादनखर्चापैकीं ६०% खर्च उसाच्या किंमतीचा असतो, म्हणून उसाच्या दरमणीं लागवडीच्या उत्पादनखर्चाविषयीं माहिती गोळा करणें इष्ट आहे. संयुक्तप्रांत, बिहार, पंजाब आणि पेप्सु, मुंबई, आंध्र आणि मद्रास ह्या राज्यांतून उसाची लागवड मोठ्या प्रमाणावर होते. 'तेथील उसाच्या लागवडीच्या खर्चाबद्दल आकडेवारी गोळा करण्याचें इंडियन सेंट्रल शुगरकेन कमिटीनें ठरविलें आहे. तीन वर्षेंपर्यंत हें काम चालू राहील व त्यास ३ लक्ष रु. खर्च येईल. नमुन्याच्या १८० खेडेगांवांतून माहिती गोळा करण्यांत येईल.

# अर्थ

बुधवार, ता. १ सप्टेंबर, १९५४





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## बँकअवार्डमध्यें सरकारनें केलेली दुरुस्ती

### ग्रामीण भागांतील बँकांना संरक्षण

बँक अवार्ड दुरुस्त करण्याचें मध्यवर्ती सरकारनें ठरविलें व त्याप्रमाणें ती दुरुस्ती पार्लमेंटच्या दोन्ही सभागृहांस सादर करण्यांत आली. सार्वजनिक हिताच्या दृष्टीनें आवश्यक अशा कमींत कमी दुरुस्त्या सरकारनें केल्या आहेत, असें त्यांचें म्हणणें आहे.

जून, १९४९ मध्यें सरकारनें बँका व त्यांचे नोकर ह्यांचेमधील तंटा निवाड्यासाठीं एका इंडस्ट्रिअल ट्रायब्यूनलकडे ("सेन ट्रायब्यूनल"कडे) सोपविला. सेन ट्रायब्यूनलनें आपला निवाडा जुलै, १९५० मध्यें दिला. सुप्रीम कोर्टांत ह्या निवाड्याविरुद्ध प्रकरण चालून, त्या ट्रायब्यूनला निवाडा करण्याचा अधिकारच नव्हता ह्या मुद्यावर, त्या कोर्टानें एप्रिल, १९५१ मध्यें तो निवाडा रद्द ठरविला. जानेवारी, १९५२ मध्यें दुसरें ट्रायब्यूनल नेमण्यांत आलें, त्यानें आपला निवाडा एप्रिल, १९५३ मध्यें दिला. तो शास्त्री अवार्ड म्हणून प्रसिद्ध आहे. ह्या अवार्डविरुद्ध कांहीं मुद्यांवर बँकांनीं तर कांहीं मुद्यांवर बँकनोकरांनीं अपील केलें, त्याचा विचार करण्यासाठीं लेबर अपेलेट ट्रायब्यूनलचें स्पेशल बेंच नेमण्यांत आलें. त्यानें आपला निवाडा २८ एप्रिल, १९५४ रोजीं जाहीर केला. ह्या अवार्डवर सरकारला निर्णय देण्यासाठीं कायद्यानें ३० दिवसांची मुदत दिली होती, ती सरकारनें वाढवून १२० दिवसांची करून घेतली.

ह्या मुदतींत, सरकारच्या सांगण्यावरून, रिझर्व्ह बँकेनें अवार्डचा वेगवेगळ्या बँकांवर व बँकिंग व्यवसायावर काय परिणाम होईल, ह्याची तपशीलवार पहाणी केली आणि प्रातिनिधिक बँकिंग-संघटनेशीं व नोकरांच्या प्रातिनिधिक संस्थांशीं विचार-विनिमय केला. त्या सर्वांचा परिणाम म्हणजे, व्यापक हिताच्या दृष्टीनें सरकारला अवार्डमध्यें कांहीं दुरुस्त्या करणें योग्य वाटलें.

बँकिंगव्यवसायांतील कांहीं बँकांच्या केवळ नफा-तोट्याकडे पाहून चालणार नाहीं. एकादी शाखा बंद पडली तर त्यावर अवलंबून असणाऱ्या व्यापारी-कारखानदारांची गैरसोय होते व रोजगारहि बुडतो. त्याचप्रमाणें, एकादी नवी शाखा उघडण्यांत आली कीं, आजवर पडून राहिलेला पैसा गोळा होण्यास मदत होऊन त्याचा उत्पादक उपयोग होतो; नव्या क्षेत्रांतील लोकांच्या पैशाच्या गरजा भागण्याची सोय उपलब्ध होते. आजच्या परिस्थितींतहि लहान गांवें व खेडीं ह्यांत बँकिंगच्या सोईचा अभाव आहे; लहान लहान बचती शक्य त्या मार्गांनीं जमा करून त्यांचा राष्ट्रीय विकासासाठीं उपयोग करणें हें सरकारचें धोरण आहे. अशा परिस्थितींत, विद्यमान बँक कचेऱ्या बंद पडणें राष्ट्रीय हिताचें नाहीं. बँका, त्यांचे नोकर किंवा ट्रायब्यूनल ह्यांच्या विचारकक्षेबाहेरचे हे व्यापक मुद्दे होते; त्यांचा विचार करून सार्वजनिक हिताच्या दृष्टीनें अवार्ड बदलणें सरकारला आवश्यक वाटत आहे.

अवार्डची मूळ स्वरूपांतच अंमलबजावणी केली, तर कित्येक शाखा बंद केल्या जातील, आणि मजबूत मोठ्या बँका सुद्धां शाखा-विस्तार करण्यास प्रवृत्त होणार नाहींत. लहान बँकांवर अवार्डचा अत्यंत प्रतिकूल परिणाम होईल, व त्यांचें आस्तित्वच धोक्यांत येईल. देशाच्या कित्येक विभागांत लहान बँकांखेरीज दुसरें आर्थिक व्यवहारांचें साधनच उपलब्ध नाहीं व तें नाहींसें झालें तर लहान लहान उद्योगधंद्यांची आतिशय गैरसोय होईल. कांहीं थोड्या बँका बंद पडल्या, तरी एकूण बँकिंगच्या व्यवसायाबद्दलच गैरविश्वास निर्माण होण्याचा संभव आहे. बँकांच्या दृष्टीनें एक महत्त्वाची दुरुस्ती म्हणजे ३०,००० लोकवस्तीपेक्षा लहान गांवांसाठीं बँकांचा ४ था वर्ग निर्माण करण्यांत आला आहे. रूरल बँकिंग चौकशी कमिटीनें सुचविलेंच होतें कीं, ५०,००० लोकवस्तीच्यापेक्षा लहान गांवांची अवार्डमधून मुक्तता करण्यांत यावी. बँकांच्या ३ ऱ्या वर्गासाठीं शास्त्री अवार्डनें जे पगार व भत्ते सांगितले होते, तेच आतां ह्या ४ थ्या वर्गाला लागू करण्यांत आले आहेत. (क्षेत्र १ मध्यें कलकत्ता, मुंबई, मद्रास, दिल्ली व अहमदाबाद हीं शहरें येतात; क्षेत्र २ मध्यें वरील शहरें वगळून, १ लक्ष लोकसंख्येवरील गांवें येतात आणि क्षेत्र ३ मध्यें इतर गांवें येतात. आतां ३० हजार वस्तीखालचीं गांवें असणारा क्षेत्र ४ हा नवा वर्ग सरकारनें निर्माण केला आहे.)

दुसऱ्या एका दुरुस्तीनुसार, ब आणि कांहीं क राज्यांतील ग्रामीण विभागांतील बँकांना अवार्डमधून वगळण्यांत आलें आहे. आतांपर्यंत ज्या बँकांना कोणत्याच ट्रायब्यूनलचा निवाडा लागू नव्हता, त्यांवर एकदम मोठ्या खर्चाच्या जबाबदाऱ्या टाकणें हितावह होणार नाहीं. ह्या विभागांत, विशेषतः त्रावणकोर-कोचीन राज्यांत, कितीतरी लहान बँका आहेत व त्यांचे प्रश्नहि वेगळ्या प्रकारचे आहेत; त्यांना इतर बँकांपेक्षा अधिक सवलती मिळणें योग्य होईल. भारतांतील इतर विभागांना लागू होणाऱ्या निवाड्यांत दुरुस्त्या करून त्याचे दुष्परिणाम टाळण्याचे सरकारनें ठरविलें, तरी त्रावणकोर-कोचीनमधील व इतर कांहीं ठिकाणच्या बँकांना तेवढ्या दुरुस्तीनें पुरेसें संरक्षण मिळणार नाहीं. म्हणून त्यांना अवार्डमधून वगळणेंच श्रेयस्कर वाटत आहे.

अशा रीतीनें, जेथें सेन अवार्डचा कांहीं काळ अंमल होता अशा "ब" राज्यांतील आणि कांहीं "क" राज्यांतील लहान बँकांचा क्षेत्र ४ हा गट करून, त्यांना क्षेत्र ३ मधील बँकांना लागू असलेले पगार व भत्ते लागू करणारी दुरुस्ती सरकारनें केली आहे, आणि त्या बँकांवरील बोजा कमी केला आहे. त्याचप्रमाणें, ३० हजार लोकवस्तीखालील ब राज्यांतील व कांहीं क राज्यांतील गांवें अवार्डमधून मुक्त केलीं आहेत. बँकिंगच्या प्रसाराच्या कांहीं अडचणी दूर करून सरकारनें ग्रामीण विभागांच्या सोईकडे लक्ष दिलें आहे. अवार्डमधील इतर दुरुस्त्यांचा विचार ह्या ठिकाणीं केला नाहीं. सेन अवार्ड ज्या २०० बँकांना लागू होता, त्याच

बँकांना शास्त्री अवार्ड लागू असून, त्याबाबतचा सरकारचा निर्णयहि असाच मर्यादित आहे. म्हणजे, अवार्डमधील पगार व भत्ते २८ सप्टेंबर, १९४९ ह्या दिवशीं ज्या बँकांच्या शाखा एकापेक्षा जास्त प्रांतांत होत्या, अशांनाच लागू आहेत. महाराष्ट्रीय बँकांपुरतें पाहिलें, तर मुंबईमधील एक महाराष्ट्रीय शेड्यूल्ड बँक व पुण्यांतील एक महाराष्ट्रीय शेड्यूल्ड बँक खेरीज इतर बँकांवर निवाड्याप्रमाणें व त्यावरील सरकारी दुरुस्त्याप्रमाणें पगार, भत्ते, इत्यादी देण्याची जबाबदारी नाहीं.

### बँक-नोकरांच्या वेतनश्रेणींत सरकारनें केलेल्या दुरुस्त्या

( १ ) शास्त्री ट्रायब्यूनलनें दिलेल्या वेतनश्रेणीपेक्षा लेबर अॅपेलेट ट्रायब्यूनलनें दिलेल्या जादा वेतनश्रेणी कायम ठेवल्या असल्या तरी सर्व विभागांतील महागाई भत्त्याचें नियमन अॅपेलेट ट्रायब्युनलनें दिलेल्या निर्णयाप्रमाणें न करतां शास्त्री-निवाड्याप्रमाणें करण्यांत येईल.

( २ ) सर्व विभागांत ३१ जानेवारी, १९५० रोजीं नोकरींत असलेल्या नोकरवर्गाचे बाबतींत नव्या वेतनश्रेणींची जुळणी जास्तींत जास्त चार वेळेच्या पगारवाढींत शास्त्री-निवाड्यामध्यें दिलेल्या कोष्टकाप्रमाणें करण्यांत येईल.

( ३ ) नोकरांचा मार्च, १९५४ चा एकूण पगार सुधारलेल्या निवाड्यांतील तरतुदीनुसार त्यास मिळावयाच्या पगारापेक्षा अधिक असल्यास, या निवाड्याची अंमलबजावणी झाल्याच्या दिनांकापासून तीन वर्षांत या दोहोंतील तफावत जुळवून घेण्यांत येईल. त्या दिनांकापासून पुऱ्या झालेल्या प्रत्येक १२ महिन्यांनंतर अशा जादा रकमेच्या एक तृतीयांश रक्कम कापून तें साधण्यांत येईल. ( नोकरास ३१ जानेवारी, १९५० रोजीं मिळालेल्या एकूण पगाराची रक्कम कमी करण्यांत येऊं नये, अशी तरतूद शास्त्री आणि अॅपेलेट ट्रायब्यूनल या दोघांच्याहि निर्णयांत आहे. )

### कोल्हापुरांत बँक जिमखाना

बँकांतील नोकरवर्गांत क्रिकेटचे सामने प्रिय होत चालले आहेत व बँकांचे संघ सुटीच्या दिवशीं सामने खेळूं लागले आहेत, ही अत्यंत आनंदाची गोष्ट आहे. महाराष्ट्रांत पुण्यांत हा उपक्रम सुरू झाला, त्याच्या पाठोपाठ कोल्हापुरांतील बँकांतहि त्याचें अनुकरण झालें व त्याला पद्धतशीरपणाहि प्राप्त झाला. तेथील सर्व बँकनोकरांचा एक बँक जिमखाना स्थापन करण्यांत आला आहे व तेथें सुरू होणाऱ्या सर लष्कर बहादुर क्रिकेट लीग टूर्नामेंटमध्यें जिमखान्याचा संघ भाग घेणार आहे, असें समजतें. राजाराम कॉलेज, गोखले कॉलेज, कोल्हापूर स्पोर्ट असोसिएशन, शाहूपुरी जिमखाना, फ्रेंड्स इलेव्हन, अशा पांच संघांशीं बँक जिमखाना सामने खेळेल. पुण्याच्या व कोल्हापूरच्या पाठोपाठ इतर ठिकाणच्या बँकांतहि जागृति होणें इष्ट आहे. बँक चालकांनीं अशा उपक्रमांस सक्रिय प्रोत्साहन दिलें, तर त्यामुळें नोकरांचा उत्साह वाढून त्याचा अप्रत्यक्ष फायदा बँकांनाच मिळेल, हें उघड आहे. बँक नोकरांनीं चिकाटीनें प्रयत्न केल्यास त्यांचें क्रिकेट चिरस्थायी होऊं शकेल.

### रिझर्व्ह बँकेचें "बँक स्टाफ ट्रेनिंग कॉलेज"

रिझर्व्ह बँकेनें स्थापन केलेलें बँक स्टाफ ट्रेनिंग कॉलेज ह्या महिन्यांत सुरू होत आहे. कोलंबो योजनेखालीं दोन बँकिंग तज्ज्ञ कॉलेजच्या बाबतींत मार्गदर्शन करणार असून, ते भारतांत येऊन दाखल झालेले आहेत. बडोदें विद्यापीठानें अशाच प्रकारचें एक कॉलेज ह्यापूर्वी सुरू केलेलें आहे. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ बँकर्सच्या परीक्षेंत उत्तीर्ण झालेल्या सर्वांना बँक स्टाफ ट्रेनिंग कॉलेजांत प्रवेश खुला आहे.


## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

— पुणें शहर —

लक्ष्मी रोड

पोस्ट बॉक्स नं. ५११ ] [ टेलिफोन नं. १४८३

भोर, पौड व वडगांव ( मावळ ) येथें बँकेनें आपल्या नवीन शाखा-कचेऱ्या उघडल्या आहेत. येथें व इतर शाखांतहि सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार व सहकारी सोसायट्यांना शेतीसाठीं कर्जे देणें, सोनें-चांदीचे तारणावर कर्जे देणें, वगैरे व्यवहार सुरू केले आहेत.

चालू, सेव्हिंग्ज ठेवी स्वीकारल्या जातात.

अेक ते दहा वर्षें मुदतीच्या ठेवीहि स्वीकारल्या जातात.

१ वर्ष २ टक्के, २ वर्षे २॥ टक्के, ५ वर्षे ३ टक्के, ७ वर्षे ३॥ टक्के, १० वर्षे ४ टक्के. याशिवाय रुपये २५,००० अगर पुढील रकमा ३ ते ९ महिने मुदतीनें घेण्यांत येतात.

दराबद्दल समक्ष चौकशी करावी.

वरीलप्रमाणें सर्व व्यवहार पुणें येथें मुख्य कचेरींत व इतर शाखांमध्यें होत असून त्याखेरिज पुणें येथें सेफ डिपॉझिट व्हॉल्ट्स् व सेफ कस्टडीची सोय आहे. त्याचा फायदा खातेदारांनीं घ्यावा.

जास्त माहितीसाठीं लिहा अगर समक्ष भेटा.

मो. वि. रबडे,
मॅनेजिंग डायरेक्टर.

## दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर ( बेलापूर रोड ), ओझर ( जि. नाशिक ) खोपोली ( जि. कुलाबा )

श्री. के. पां. जोशी ( अध्यक्ष ) | श्री. ह. ब. गिरमे ( उपाध्यक्ष ).

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,००० |
| रिझर्व्ह फंड व इतर रिझर्व्ह | रु. १,००,००० |

एकूण खेळतें भांडवल ६० लाखांचे वर

बँकेचे नवीन इमारतींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
} मॅनेजिंग डायरेक्टर.

# बँक म्हणजे "ठेवी"च्या शकुंतलेचें संगोपन करणारा कण्व

## बँकिंगसंबंधी कांहीं विचार

( ले. श्री. गो. वि. सराफ, बी. ए., एलएल. बी., डायरेक्टर, दि बेळगांव बँक लि. )

बँकिंगचा धंदा हें शास्त्र आहे कीं कला, ह्याचें उत्तर "दोन्ही" असें द्यावें लागेल. ह्या शास्त्रांतील सत्यें आणि तत्त्वें अनुभवाच्या आधारानें हजारों वर्षांच्या कालानें उघडकीस आलेलीं अशीं आहेत आणि त्यासाठी समाजाला बरीच मोठी किंमतहि द्यावी लागलेली आहे. ज्या बँकरवर विश्वास टाकला अशापैकीं कांहींच्या गैरवर्तणुकीमुळें, अननुभवामुळें अगर धंद्यांतील चुकांमुळें शेंकडों कुटुंबांना न भरून येण्याइतकें नुकसान सोसावें लागलेलें आहे. खऱ्या बँकरला दानशूराप्रमाणें वागतां येत नाहीं किंवा इष्टापत्तीची अपेक्षा जमेस धरूनहि चालतां येत नाहीं. आपल्याजवळ असणाऱ्या पैशावर अव्याहत पण निश्चित अशी प्राप्ति होण्यावरच त्याला समाधान मानावें लागतें. आपल्याजवळ असणारा पैसा ठेवीदारानें परत मागतांच त्याला परत द्यावा लागेल, हें विसरून त्याला कधींहि चालणार नाहीं.

खरोखर बँकिंग ही एक मोठी कलाच नाहीं काय ? ती जीवनाचीच कला आहे. ठेवीदारानें मागणी करतांच पैसा परत करू ह्या अटीवर लोकांजवळचा पैसा आकर्षित करणें आणि तो अशा तऱ्हेनें गुंतविणें कीं ज्यामुळें त्याची वृद्धि होऊनच्या होऊन तो वेळेवर परत मिळूं शकेल, हा व्यवहार करणें म्हणजे एक कलाच आहे. ह्या दृष्टीनें पहातां बँकर हा जन्मसिद्धच असतो, तो तयार होऊं शकत नाहीं. कांहीं कांहीं माणसें बँकिंगच्या धंद्याला लायकच नसतात. पैशाशीं कसें वागावें हें त्यांना समजत नाहीं. कौटिल्य हा प्राचीन अर्थशास्त्रज्ञ म्हणतो कीं, 'तुमचा पैसा आणि माझी बुद्धि' ह्यांची सांगड घातली पाहिजे. अशी कल्पना करा कीं, एखाद्या नव्या ठिकाणीं भाड्याच्या जागेत एखाद्या बँकेनें आपली कचेरी उघडलेली आहे. ह्या ठिकाणच्या लोकांना बँकेच्या डायरेक्टरांची ओळख नाहीं अगर त्यांच्याशीं व्यक्तिशः परिचय करून घेण्याचें फारसें औत्सुक्य ते दाखवीत नाहींत; आणि तरीहि आपला श्रमानें मिळविलेला पैसा ते बँकेंत ठेव म्हणून ठेवीत आहेत. ही गोष्ट शक्य कोटींतील वाटतें काय ? पण तेंच तेथील लोकांना बँकेच्या एजंटाशीं परिचय करून घेतां आला तर त्यांना त्याचा अभिमान वाटतो. आपल्या ठेवींच्या रकमेंत वाढ केल्यानें आपलें त्याच्याजवळचें वजन वाढतें असें त्यांना वाटतें.

कोणत्या कारणामुळें मनुष्य अशा तऱ्हेनें वागण्यास प्रवृत्त होतो, तें शोधून काढणें फार मनोरंजक होईल. आपले व्यवहार बँकेमार्फत करण्याच्या संवयीमुळें सामान्य लोक अगर सुबुद्ध नागरिक आपले पैसे बँकेंत ठेवतात काय ? कां 'बँक' ह्या शब्दांतच अशी मोहिनी असते, कीं संस्थेच्या भक्कमपणाचा अगर इतर गोष्टींचा ते विचारच करीत नाहींत ? कां अधिक दरानें व्याज मिळविण्याचा त्यांचा हेतु असतो ? ह्यापैकीं एक किंवा अनेक, कांहींहि कारणें असोत. एक गोष्ट मात्र निश्चित आहे. बँकेच्या चालकांचा प्रामाणिकपणा, निःस्वार्थ बुद्धि व सावधानता आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांची समाजांतील वागणूक, ह्या बाबी बँकेची एकसारखी आणि निश्चित प्रगति होण्यास फारच उपयुक्त ठरतात.

आधुनिक समाजांत बँक ही एक गरजेची बाब आहे. ज्या ठिकाणीं बँकेच्या सवलतींचा योग्य उपयोग करून घेतला जातो त्या ठिकाणच्या व्यापारीवर्गाचा फार फायदा होतो. त्याचबरोबर स्थानिक भरभराटहि साधते आणि तिचा फायदा पुन्हां बँकेलाच मिळतो. योग्य वापर केल्यास बँकेचे त्रिविध फायदे होतात आणि ते भागीदार, ठेवीदार आणि व्यापारी ह्यांना मिळतात. त्याशिवाय रोजगारी मिळते ती वेगळीच.

रक्ताच्या बँकेमधील रक्त मानवी शरीरांत घातलें तर मनुष्याच्या जीवनांत जसें चैतन्य येतें, त्याचप्रमाणें देशाच्या आर्थिक जीवनांतील रक्त जो पैसा, त्याचें योग्य तऱ्हेनें अभिसरण आणि वृद्धि करून योग्य तऱ्हेनें चालविलेल्या बँका राष्ट्राचें आर्थिक जीवन जोमदार करतात.

बँका कां बुडतात ? कारण, ठेवीदार एकदम पैसे मागू लागले म्हणजे बँकांना ते देतां येत नाहींत. ठेवींची रक्कम ही भाग-भांडवलापेक्षा केव्हांहि पुष्कळच अधिक असते. पण आपणांस असेंहि दिसून येतें कीं कांहीं बँकांनीं अशा भाऊगर्दीला अनेकदा यशस्वी तऱ्हेनें तोंड दिलेलें आहे. बँका आपल्या ठेवीदारावर इतका विश्वास कसा टाकतात ? हा विश्वास उडाल्यावर बँकांनीं आपला बचाव कसा करावा ? बँकांचा मुख्य आधार म्हणजे योग्य तारणावर दिलेलीं कर्जें. हे व्यवहार पैसे उभे करण्यास सोयीचे असे असले पाहिजेत. बँकेचा भक्कमपणा तिच्या भाग-भांडवलावरून अगर ठेवींच्या रकमेवरून ठरवावयाचा नसतो. कर्जें देण्याची पद्धत योग्य व सावधानतेची आहे कीं नाहीं ह्यावरून तो ठरवावयाचा असतो. आपल्या कुवतीपेक्षा अधिक व्यवहार करण्यामुळेंहि कांहीं बँका पेंचांत सांपडलेल्या आहेत. अशा प्रकारच्या व्यवहारांमुळें आपल्या देशांत आणि परदेशांत कांहीं दशकांपूर्वी बँकांवर अरिष्टें कोसळलीं होतीं. पण, आतां भारतांत रिझर्व्ह बँक ऑफ इंडियासारखी सर्वसत्ताधारी मध्यवर्ती संस्था असल्यानें बँकिंगचा व्यवसाय योग्य आणि प्रगतिकारक पथावर ओढून आणण्यांत आला आहे.

बँकिंगच्या धंद्यांतील अहितकारक प्रथा नाहींशा करणें हा बँकिंग कंपनीज ॲक्टचा उद्देश आहे. स्टॅट्यूटरी रिझर्व्ह राखण्याची तजवीज, कांहीं किमान ठराविक रक्कम सरकारी रोख्यांतच गुंतविण्याची सक्ति, कांहीं किमान रक्कम रोख राखण्याची सक्ति, इत्यादि नियम काटेकोरपणें पाळण्यांत आले तर आपल्या ताकदीपेक्षा जास्त व्यवहार होणार नाहींत. शिवाय, रिझर्व्ह बँकेकडून मधून मधून होणारी तपासणी आणि मागविण्यांत येणारे तक्ते ह्यांच्यामुळें एखादी संस्था ठेवीदारांच्या हितसंबंधांना धोका आणण्याचा संभव आहे किंवा काय तें रिझर्व्ह बँकेला कळूं शकतें आणि तसा धोका असल्यास उपाययोजनाहि करतां येते. अडचणीच्या काळांत बँकांना रिझर्व्ह बँकेकडून मार्गदर्शनच काय पण मदतहि मिळेल. पण अशी मदत मिळण्यासाठी बँकांनीं आपले पैसे योग्य वेळीं परत मिळतील अशा पद्धतीनेंच गुंतविलेले असले पाहिजेत.

आपल्याला ह्यासंबंधीं नुकतीच घडलेलीं कांहीं उदाहरणें माहीत आहेत. कांहीं बँकांना मदत देणें रिझर्व्ह बँकेला शक्य झालें नाहीं आणि म्हणून त्या बँकांचे दरवाजे बंद झाले. बंगालमधील कांहीं बँकांच्या चालकांना कोर्टांत खेचल्याचीं कांहीं उदाहरणें ताजींच आहेत. तेव्हां ज्या बँका अशी मदत देण्याला पात्र असतील, त्यांनाच ती दिली जाईल हें उघड आहे.

बँक जीं कर्जें देते तीं देण्यामागील धोरणाची सावधानता कशावरून ठरवावयाची ? हीं कर्जें वेळेवर आणि सुलभ रीत्या

परत आली पाहिजेत. ह्यापेक्षा दुसऱ्या कोणत्याहि पद्धतीनें बँकेचा पैसा गुंतविला गेला असेल, तर तो अडकूनच रहातो अथवा कमी होतो किंवा वेळेवर उपयोगी पडत नाहीं; मग तो हिशोबाला कितीहि फायदेशीर रीत्या गुंतविलेला असो. दीर्घ मुदतीच्या सरकारी रोख्यांत पैसा गुंतविणें हें सुद्धां जोखमीचें आहे. सरकारनें आपलें आर्थिक धोरण बदललें अगर एखादी विपरीत राजकीय घटना घडून आली तर सरकारी रोख्यांचे भाव कसे उतरतात हें आपण नुकतेंच अनुभविलें आहे. खरीखुरी ट्रेड बिल्स, जरूरीच्या वस्तूंच्या हंगामाच्या वेळीं गुदामांच्या तारणावर दिलेलीं कर्जें, शेअरबाजारांतील शेअर्स, विमा–पत्रकें आणि सोनें ह्यावर दिलेलीं कर्जेंच योग्य व उत्तम प्रतीचीं होत. वैयक्तिक जबाबदारीवर दिलेल्या कर्जांवर चांगले निर्बंध असले पाहिजेत. पतीच्या, प्रामाणिक आणि खऱ्या सुऱ्या धंदेवाल्यांनाच तीं देण्यांत यावींत. कर्ज घेणाऱ्या माणसाची नैमित्तिक गरज भागवून त्याची सोय पहाणें हाच अशा कर्जाचा स्पष्ट हेतु असला पाहिजे. अशा गरजा नेहमींच्या व्यवहाराच्या बाहेरच्या असल्यामुळें व्यापारी संपूर्णपणें बँकेच्या मदतीवर कधींच अवलंबून असत नाहींत. केवळ ह्याच अर्थानें असें म्हणतां येईल कीं, बँक ज्यांना गरज नाहीं त्यांना मदत करते. अशा बँका भक्कम पायांवर उभारलेल्या असतात आणि त्या समाजाची जरूर ती सेवा करीत असतात. अधिक समर्थांकडून मदत मिळविण्याविषयीं त्यांना कधींहि काळजी करावी लागत नाहीं.

आपला बँकिंगचा व्यवसाय फक्त व्यापारी गरजांपुरताच मर्यादित आहे. परंतु राष्ट्राचा औद्योगिक विकास ज्या प्रमाणांत होऊं लागेल त्या प्रमाणांत बँकांनीं उद्योगधंद्यांच्या गरजाहि पुरविल्या पाहिजेत. खरें पहातां त्यांचें क्षेत्र इतकें व्यापक असलें पाहिजे कीं कोणत्याहि प्रकारच्या खऱ्या उत्पादक कार्याला त्यांनीं हातभार लावला पाहिजे. बँकेचे ठेवीदार आणि सभासद ह्यांच्या दृष्टीनें बँकेचा व्यवहार अधिक सुखकर आणि जलद कसा होईल ह्याचाहि विचार केला गेला पाहिजे.

बँक फक्त पैशाचे व्यवहार करते आणि तेहि केवळ नफा मिळविण्याच्या हेतूनें. तेव्हां बँकरला तत्त्वज्ञान असेल हें म्हणणें अज्ञानी लोक नाकबूल करतील. पण बँक ही संस्था सर्वांत उत्तम तत्त्वज्ञानाच्या आचारानेंच चालते आणि भरभराटते.

आपला शब्द निष्ठापूर्वक पाळणें हें बँकरच्या वागणुकीचें मुख्य सूत्र असतें. थोडासा जरी उशीर झाला तरी त्याची पत जाते. आपल्याजवळील ठेवीकडे, कण्व शकुंतलेकडे ज्या भावनेनें पहात असे, त्याच भावनेनें तो पहातो. ठेवीच्या कन्येचें संगोपन करणें आणि ती वेळेवर परत करणें हेंच त्याचें ध्येय असतें. ह्या आदर्शापासून चळणारा बँकर दूषणच ठरेल.

### पंजाब नॅशनल बँकेची मदत

पंजाब नॅशनल बँकेनें बिहारमधील पूरग्रस्तांच्या मदतीसाठी पंतप्रधानांनीं उभारलेल्या फंडास १०,००० रु. दिले आहेत.

### डेक्कन इन्स्टिट्यूट ऑफ कॉमर्स

जी. सी. डी., जी. सी. सी., एल. सी. सी., डी. कॉम. व इन्स्टिट्यूट बुककीपर्स परीक्षांत उत्तीर्ण झालेल्या, वरील संस्थेच्या विद्यार्थ्यांना डिप्लोमा व सर्टिफिकिटें वाटण्याचा समारंभ शनिवार, दि. २८ ऑगस्ट, १९५४ रोजीं सायंकाळीं श्री. श्री. वा. काळे, संपादक "अर्थ", ह्यांच्या अध्यक्षतेखालीं झाला.

## शेतकऱ्यांना मध्यम मुदतीचीं कर्जें

### रिझर्व्ह बँक कायद्यांतील दुरुस्तीची अंमलबजावणी

रिझर्व्ह बँक कायद्यांत गेल्या वर्षी दुरुस्ती करण्यांत येऊन तिला राज्य सहकारी बँकांना मध्यम मुदतीचीं कर्जें देतां यावींत अशी सुधारणा करण्यांत आली आहे. हीं कर्जें शेतीच्या कामासाठीं, ठराविक मुदतीनंतर परतफेडीचीं, १५ महिन्यांपेक्षा ज्यास्त पण ५ वर्षांपेक्षा कमी मुदतीचीं असलीं पाहिजेत. ह्या कर्जांच्या मुद्दलाची व व्याजाची राज्य सरकारनें हमी घेतली पाहिजे. कोणत्याहि राज्य सहकारी बँकेला द्यावयाचें कर्ज तिच्या स्वतःच्या मालकीच्या ( म्हणजे वसूल भांडवल + गंगाजळी ) भांडवलापेक्षा अधिक असणार नाहीं. रिझर्व्ह बँकेनें वेगवेगळ्या राज्य सहकारी बँकांना दिलेल्या ह्या कर्जांची एकूण रक्कम कोणत्याहि वेळीं ५ कोटी रुपयांपेक्षा अधिक भरतां कामा नये.

कायद्याच्या वरील दुरुस्तीची अंमलबजावणी करण्याची पूर्वतयारी झाली आहे. राज्य सहकारी बँकांनीं ह्या कर्जांचे बाबतींत काय काय करावयास हवें, ह्याची योजना रिझर्व्ह बँकेनें राज्य सहकारी बँकांकडे व राज्य सरकारांकडे पाठविली आहे. पांच वर्षेपर्यंतच्या मुदतीच्या कर्जास कायद्यानें परवानगी दिली असली, तरी शक्य तों तीन वर्षांच्या मुदतीचीं कर्जेंच दिलीं जातील, असें रिझर्व्ह बँकेनें कळविलें आहे. त्यामुळें, कर्जांत पैसा गुंतून न पडतां त्याची उलाढाल होऊं शकेल. जेथें तीन वर्षांपेक्षा ज्यास्त मुदतीच्या कर्जांची खरोखरच आवश्यकता आहे, अशा ठिकाणीं तीन वर्षांच्या मुदतीचा आग्रह धरला जाणार नाहीं. रिझर्व्ह बँकेनें काढलेल्या सर्क्युलरमध्यें, कोणकोणत्या कारणांसाठी कर्जें दिलीं जातील, त्यांची यादी दिली आहे. नवी जमीन लागवडीखालीं आणणें, बांध, ताली, इतर जमीन सुधारणा, फळबागा व मळे ह्यांसाठीं जमीन तयार करणें, किरकोळ पाणीपुरवठ्याच्या योजना, जनावरें, यंत्रसामुग्री, वहातुकीचीं साधनें ह्यांची खरेदी, गोठे वगैरे बांधणें, इत्यादींसाठी कर्जांस प्राधान्य मिळणार आहे.

रिझर्व्ह बँक ह्या कर्जांवर राज्य सहकारी बँकांकडून अल्प मुदतीच्या म्हणजे १५ महिन्यांखालील मुदतीच्या कर्जांवरील व्याजाप्रमाणेंच सवलतीचा दर आकारणार आहे. हा दर बँक-रेटच्यापेक्षा २% कमी असा राहील. सध्या बँकरेट ३½% आहे. म्हणजे, रिझर्व्ह बँक ३½ – २ = १½% दरानें व्याज घेईल. इतक्या सवलतीच्या दरानें रिझर्व्ह बँक राज्य सहकारी बँकांना कर्ज देणार, त्याचा फायदा शेतकऱ्यापर्यंत पोचला पाहिजे, ह्या आवश्यक गोष्टीकडे रिझर्व्ह बँकेनें राज्य सरकारांचें व राज्य सहकारी बँकांचें मुद्दाम लक्ष वेधलें आहे. अखेरच्या कर्जदाराला ६¼% पेक्षा ज्यास्त व्याज पडूं नये, अशी रिझर्व्ह बँकेची सूचना आहे. रिझर्व्ह बँक व अखेरचा कर्जदार शेतकरी, ह्यांमधील प्रत्येक दुव्याचे ठिकाणीं व्याजाच्या दरांत वाढ होत जाणार हें उघड आहे. पण ६¼% खालीं शेतकऱ्याच्या कर्जदारास कर्ज देतां आलें नाहीं, तर केंद्रीय व मध्यवर्ती बँकांनीं व्याजाच्या दरांतील तफावतीचा उपयोग आपले रिझर्व्हज् मजबूत करण्याकडे करावा, अशी रिझर्व्ह बँकेची सूचना आहे.

**एंडिबरो येथील चित्रपटमहोत्सव**—एंडिबरो येथें सध्यां आंतरराष्ट्रीय चित्रपटांचा महोत्सव चालूं आहे. महोत्सवांत दाखविण्यासाठी म्हणून भारतीय सरकारच्या चित्रपट–विभागानें सहा अनुबोधपटांची निवड केली आहे. त्यांपैकीं निदान दोन चित्रपट तरी महोत्सवांत दाखविण्यांत येतील, असें समजतें.

## पुस्तकपरीक्षण

### केंप एंजिनिअर इअर बुक, १९५४. आवृत्ति ५९ वी.

(ग्रंथ दोन, पृष्ठ-संख्या ३०००. किंमत ७५ शिलिंग. टाइप टाइम्स रोमन् पॉइंट ६. विभाग ७९. तज्ञ लेखकांची संख्या ७३. मुख्य संपादक सी. ई. प्रॉक्टर आणि प्रमुख मार्गदर्शक वी. डब्ल्यू. पेन्ट्रेड. छपाई पेज ब्रदर्स यांनीं केली आहे. प्रस्तावना लेखक पेन्ट्रेड हे आहेत.) हा ग्रंथ मौल्यवान् आहे व त्यांत स्थापत्य विषयाच्या सर्व शाखांची संपूर्ण अद्ययावत् माहिती अत्यंत कौशल्यानें व शास्त्रशुद्ध रीतीनें दिलेली आहे. पुस्तकांत स्पष्टीकरणार्थ सहस्रावधि चित्रें व ड्रॉइंग काढलेलीं आहेत. ड्रॉइंगला जोडून यांत्रिक रचनेचीं स्पष्टीकरणें दिलेलीं आहेत. कोळसा, लोखंड, सोनें यांचें शुद्धीकरण ड्रॉइंगच्या व चित्रांच्या टिपणांच्या साधनानें फारच उत्तम प्रकारें सुस्पष्ट करण्यांत आलेलें आहे. इंग्लंड, स्कॉटलंड, या देशांतील प्रमुख कारखानदारीच्या सुमारें ३०० चे वर जाहिराती या ग्रंथांत दिल्या आहेत. ग्रंथाचा विस्तार मोठा असल्यामुळें कांहीं जाहिराती एकाहून अधिक वेळां व अधिक ठिकाणीं आलेल्या आहेत. जाहिराती व त्यांतून दिसणारें उत्पादन व त्यांतील विविधता पाहिली म्हणजे यंत्रविद्या, शास्त्र व उत्पादन यांचे बाबतींत इंग्लंड देश कसा बलशाली आहे, याची कल्पना सहज येते. यांत विषय देखील असंख्य आलेले आहेत. त्यांत कांहींची नामावलि पुढें दिली आहे. रंग व व्हार्निश, पाण्यावर चालणारीं एंजिनें, टरबाइन्स, रस्त्यावरील कामांचीं यंत्रें, प्रवाही साधनानें चालणारे पंप, थंड करण्याची व सांठविण्याची यंत्र-रचना, धातूंचीं खनिजें, मोजमापांचीं साधनें, स्प्रिंग, एंजिनें, हत्यारें व यंत्रें मोजणी, झाळणें व सांधकाम,; पाण्याच्या जोरानें चालणारीं यंत्रें, पट्टे व सांखळ्या, विजेसंबंधीं स्थापत्य, ज्योतीनें जोडणें व सांधणें, पेटन्ट डिझाइन व ट्रेडमार्क, तेलानें चालणारीं बोटीवरील एंजिनें, पूल व पूलबांधणी, इलेक्ट्रॉनिक एंजिनियरिंग, लोखंड व बीड, आरोग्यशास्त्र, खाणींतील कामें, यंत्रानें कारखान्यांतील वहातूक, लाकूड व लाकूड करवत कामाच्या गिरण्या, सरपण, इमारत-रचना-शास्त्र, इमारतींतील ध्वनिशास्त्र, धातूंच्या द्रव्यांचें पीठ, स्फोटक द्रव्यें, आगगाडी, विटा, वाफेचीं यंत्रें, वाफेवर चालणारे घण, कारखान्याच्या वसाहतीची आंखणी व मांडणी, लिफ्ट व एस्केलेटर, धारा लावण्याचें व घासण्याचें साहित्य, दोर व दोरावरून रस्ते, सिमेंट, चुना, डिंक व खळी, हवा-वाहतूक, हवा कृत्रिम रीतीनें बनविणें, ॲटोमिक शक्ति, प्लास्टिक. इ. इ. या ग्रंथामध्यें कोणासहि त्याला हवी अशी उपयुक्त व आजच्या दैनंदिन गरजेसंबंधीं माहिती मिळूं शकेल. संदर्भ ग्रंथ या दृष्टीनेंहि या ग्रंथाची उपयुक्तता मोठी आहे. हा ग्रंथ महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालयाच्या वाचनालयांत पहावयास मिळेल. वजनें, मापें, प्रमाणें, तयार उत्तरें, यांचीं बहुसंख्य कोष्टकें हरघडी उपयोगी पडणारीं आहेत.

महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालय पुणें २, दि. २०-८-५४ — भा. वि. घारपुरे, क्युरेटर

### कोरियन युद्धांत ३३,४०७ अमेरिकन सैनिक कामास आले

कोरियन युद्धांत २३,३४५ अमेरिकन सैनिक मरण पावले, २,४८९ जखमी झाल्यावर मेले व ७,५७३ अमेरिकन सैनिक बेपत्ता असून ते मृत असावेत असा युद्धतहकुबी झाल्यावर ११ महिन्यांनंतरचा आढावा आहे.

### जत येथें सहकारी शिक्षण वर्ग

दक्षिण सातारा जिल्हा को. बोर्डाच्या विद्यमानें जत येथें सहकारी सेक्रेटरी शिक्षण वर्ग भरविणेंचे ठरविलें आहे. सदर वर्ग ता. १३ सप्टेंबर १९५४ पासून दीड ते दोन महिने चालेल. जत तालुक्यांतील सहकारी संस्थांनीं आपले अन्ट्रेन्ड सेक्रेटरींना सदर वर्गाला पाठवून त्याचा फायदा घ्यावा. तसेंच इतर व्ह. फा. पास झालेल्या उमेदवारांनीं व नवीन अन्ट्रेन्ड सेक्रेटरींनीं अर्ज ता. १०-८-५४ चे आंत खालील पत्त्यावर पाठवावेत. सोबत वर्ग फी व परीक्षेची फी मिळून एकंदर रु. ३ ची मनीऑर्डर पाठवावी. ज्यांनीं मुदतींत अर्ज व फी पाठविली असेल त्यांनीं १३ सप्टेंबर १९५४ रोजीं सकाळीं ११ वाजतां जत तालुका को. सुपरवायझिंग युनिअन लि. जत या ऑफिसमध्ये हजर रहावें.

डी. बी. निकम, B. A., मेंबर सेक्रेटरी, द. सातारा जि. को. बोर्ड लि. सांगली — बळवंतराव मारुती पाटील, चेअरमन, द. [सा]तारा जि. को. बोर्ड लि. [सां]गली

### प्राथमिक शिक्षण सहकारी सेक्रेटरी शिक्षणवर्गाचा निकाल

द. सातारा जिल्हा को. बोर्ड लि. सांगली या संस्थेच्या विद्यमानें सांगली येथें ता. ५-५-१९५४ ते २७-५-१९५४ अखेर झालेल्या सहकारी सेक्रेटरी शिक्षणवर्गाच्या परीक्षेस एकूण १७ विद्यार्थी बसले होते. उत्तीर्ण विद्यार्थ्यांचें शें. प्रमाण ८८.४ आहे.

(१) वर्ग १ ला—(१) ज्ञा. बा. पाटील.

(२) वर्ग २ रा—(१) मल्लया सातया मठपती, (२) शा. ज्ञा. चोपडे, (३) नि. शं. पाटील, (४) श. चां. शेख, (५) वि. इ. बारड.

३) वर्ग ३ रा—(१) स. सु. भोई, (२) सं. बा. पाटील (३) रा. ज. कठारे, (४) ज. रा. पाटील, (५) शं. आ. चौगुले, (६) शि. आ. खराडे, (७) र. शं. खुळे, (८) नि. ह. निकम, (९) श्रीमती मंगला लक्ष्मण पाटणकर.


### बँकेच्या फक्त सभासदांकरितां

दि कराड अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., कराड.

## भागदारांस नोटीस.

बँकेच्या भागदारांची सदतिसावी वार्षिक साधारण सभा रविवार तारीख १९-९-५४ रोजीं सकाळीं ७ वाजतां बँकेच्या इमारतींत भरणार आहे. या सभेंत सन १९५३-५४ चा अहवाल, ताळेबंद व नफा वांटणी मंजूर करणें:—

(१) श्री. गोपाळ नारायण दातार. (२) श्री. विश्वनाथ पांडुरंग काळे. (३) श्री. नारायणराव कृष्णराव देशपांडे (४) श्री. शंकर राजाराम ढवळीकर. (५) श्री. सखाराम व्यंकटेश वाघमारे. (६) श्री. दत्तात्रय गोविंद देशपांडे या उमेदवारांतून तिघांची बोर्ड ऑफ डायरेक्टर्सवर निवडणूक करणें, अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची निवडणूक, ऑडिटर्सची नेमणूक वगैरे विषयांचा विचार करणें, वगैरे कामें केलीं जातील. डायरेक्टर्सचे निवडणुकीबाबत मतें देण्याची वेळ सकाळीं ७-३० ते दुपारीं १२-३० अशी आहे. तरी बँकेच्या सभासदांनीं येण्याचें करावें अशी विनंति आहे.

कराड. २५-८-१९५४ — शं. पु. कुलकर्णी. मॅनेजिंग डायरेक्टर.

### सात जिल्ह्यांत १,००० नव्या सहकारी संस्था

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्यें पुणें, अहमदनगर, उत्तर सातारा, दक्षिण सातारा, सोलापूर, कुलाबा व रत्नागिरी ह्या सात जिल्ह्यांत एक हजारांहून अधिक सहकारी संस्था स्थापन करण्यांत येतील व खेड्यांतील सहकारी संस्थांच्या सदस्यांची संख्या ३ लक्षानें वाढून ७५ टक्के ग्रामीण भाग सहकारी क्षेत्राखालीं येईल, असे उपाय योजण्याचा निर्णय या ७ जिल्ह्यांच्या आसिस्टंट रजिस्ट्रार यांच्या परिषदेंत घेतला आहे. ही परिषद ता. १२ व १३ ऑगस्ट रोजीं पुणें भागाचे डेप्युटी रजिस्ट्रार श्री. बी. एस्. चिटणीस यांच्या अध्यक्षतेखालीं पार पडली. ह्या परिषदेमध्यें ज्या शिफारशी मान्य करण्यांत आल्या, त्यांत प्रत्येक जिल्ह्यांत एक मनोरंजन व शिक्षणात्मक काम करणारी सहकारी संस्था तयार करणें आणि ज्यामुळें आदर्श खेडें बनवितां येईल अशी एक सर्वव्यापी सहकारी संस्था प्रत्येक जिल्ह्यांतील एखाद्या खेड्यांत स्थापन करतां येईल असे यत्न करण्याचें ठरलें.

कुलाबा व रत्नागिरी जिल्ह्यांतील आंबे, नारळ, सुपारी ह्यांना सहकारी मार्गानें बाजारपेठ गांठून देणें, २० सेल सोसायट्या मार्फत वेअरहाऊसेस चालविणें, साखर–तेल, तांदूळ सडणें, कापूस पिंजणें इ. धंद्यांसाठी ३५ सहकारी संस्था चालविणें, ५८ लिफ्ट इरिगेशन व ५५ सहकारी शेतांच्या संस्था प्रस्थापित करणें, सूत–लोकर कताई, कातडी कमाविणें व रंगविणें, लाख तयार करणें इ. लहान उद्योगधंद्यांकरतां निरनिराळ्या ७६ सहकारी औद्योगिक संस्था, इत्यादि कार्यक्रमाचा समावेश पुढील पंचवार्षिक योजनेमध्यें व्हावा, म्हणून करण्यांत आलेल्या शिफारशी या परिषदेंत मान्य करण्यांत आल्या. मागासलेल्या भागांत धान्य बँका उघडणें व ५१ घरबांधणीच्या सहकारी संस्था स्थापणें ह्या कार्यक्रमांचा समावेश या योजनेंत करण्यांत येईल. कुलाबा व रत्नागिरी जिल्ह्यांत सहकारी पद्धतीनें मासेमारीचा धंदा चालावा म्हणून १० नव्या संस्था काढण्यांत याव्यात अशी शिफारस करण्यांत आली. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्यें शेतीसाठी शेतकऱ्यांना तावडतोबीच्या, तसेच लांबच्या मुदतीनें पिकांवर अधिक कर्ज मिळावें म्हणून तरतूद करण्यांत येणार असल्याचें ह्या सभेंत सांगण्यांत आलें.

---

**पाकिस्तानची तागाची निर्गत**—पाकिस्तानचा तागाचा निर्गत व्यापार बराच थंडावला आहे. भारताशीं तो आतां स्पर्धा करूं शकत नाहीं. ७ कोटी रु. च्या तागाची व तागाच्या मालाची निर्गत चालू वर्षांत होईल अशी अपेक्षा होती. आतांपर्यंत फक्त ६० लक्ष रुपये किंमतीचीच निर्गत झाली आहे.

**भूदानयज्ञ बोर्डाची स्थापना**—आचार्य विनोबा भावे ह्यांना भूदानयज्ञांत मिळालेल्या जमिनींची योग्य व्यवस्था सत्वर लावतां यावी ह्यासाठी मुंबई सरकार भूदानयज्ञ-बोर्डाची स्थापना करणार आहे. ह्या बोर्डाचा अध्यक्ष व सभासद हे सरकारनियुक्त रहातील. जमिनींचें दान बोर्डाच्या नांवें लेखी बक्षिसपत्र देऊन करण्यांत यावें आणि मामलेदारांनीं चौकशी करून बक्षिसांस मान्यता द्यावी, अशी योजना आहे. ह्या संबंधांतील कायद्याचा मसुदा सरकारी गॅझेटांत प्रसिद्ध झाला आहे.

**रेल्वेच्या पाट्यांवर तामीळ व मलायलम नांवें**—दक्षिण भारतांतील रेल्वे स्टेशनच्या पाट्यांवरील नांवें इंग्रजी व हिंदीच्या जोडीला तामीळ किंवा मलायलम् मध्येंहि लिहिण्यांत यावीं, अशी साउथ इंडियन रेल्वे युझर्स परिषदेनें मागणी केली आहे.

### अवार्डमध्यें दुरुस्तीचा हा पहिलाच प्रसंग नाहीं

लेबर अपेलेट ट्रायब्यूनलच्या बँकअवार्डमध्यें सरकारनें हस्तक्षेप केला, त्यामुळें सरकारच्या पंचनिर्णयावर लोकांचा जो कांहीं थोडा विश्वास आहे, तोहि नाहींसा होईल, असें कामगार पुढाऱ्यांचें म्हणणें आहे. न्यायालयीन निवाड्यास सरकारी कार्यकारिणीनें बाजूस सारणें योग्य नाहीं; असें ते म्हणतात. सरकारनें असा हस्तक्षेप ह्यापूर्वींहि केलेला आहे, त्यावेळीं मात्र कामगार पुढाऱ्यांनीं तक्रार केली नाहीं, असें मालकवर्गाचें त्याला उत्तर आहे. डिसेंबर, १९५२ मध्यें त्रावणकोर–कोचीन सरकारनें लेबर अपेलेट ट्रायब्यूनलचा निवाडा बाजूस सारला, त्यावेळीं तर फक्त ४५ कामगारांचाच प्रश्न होता. पण, तेव्हांचा सरकारी हस्तक्षेप कामगारांच्या हिताचा व कारखानदारांच्या विरुद्ध होता. सार्वजनिक हिताचे दृष्टीनें तेव्हां सरकारनें काढलेला हुकूम चालला; मग आतां त्याच तत्त्वावर सरकारनें काढलेल्या हुकमाविरुद्ध बोलणें कितपत न्याय्य आहे? असा मालकवर्गाचा सवाल आहे.

---

### सेक्रेटरी ट्रेनिंग क्लास, नांदगांव (नाशिक)

नाशिक जिल्ह्यासाठीं, नांदगांव येथें सेक्रेटरी ट्रेनिंग क्लासचें ता. २८–८–५४ रोजीं गुरुवारीं दुपारीं ४ वाजतां मे. शिवराम वेडू पाटील, प्रेसिडेंट नाशिक जिल्हा लोकलबोर्ड आणि जिल्हा को. बोर्डाचे सभासद यांचे हस्तें उद्घाटन बालाजी मंदिराच्या माडीवर करण्यांत आलें. त्यावेळीं श्री. मनोहर कुलकर्णी, सुपरवायझर, बँक इन्स्पेक्टर आणि ४५ उमेदवार हजर होते. प्रथम श्री. एन्. वाय. कुलकर्णी यांनीं प्राथमिक भाषण केल्यावर श्री. मनोहरपंत आणि बँक इन्स्पेक्टर यांनीं भाषणें केलीं. नंतर अध्यक्षांनीं सहकारी शिक्षणाचें महत्त्व सांगून नांदगांव तालुक्यांत प्रथमच असा क्लास भरण्याबद्दल बोर्डाचें अभिनंदन केलें व भाषण संपवून क्लासचें उद्घाटन केलेचें जाहिर केलें. हा क्लास नांदगांव येथें २५ आक्टोबर, १९५४ अखेर चालणार असल्याचेंहि विदित केलें व कार्यक्रम संपविला.

---

**कर्ज घेणारासाठीं इंपीरिअल बँकेची योजना**—राष्ट्रीय विकास योजना कर्ज घेणें लोकांना सोईचें व्हावें, ह्यासाठीं इंपीरिअल बँकेनें कर्जरोख्याच्या ९०% रक्कम ३½% दरानें कर्जाऊ देण्याची योजना आखली आहे. ह्याच दरानें कर्जरोख्यावरहि व्याज मिळत रहातें; परतफेडीचे हप्ते सवलतीचे ठेवलेले आहेत.

**वीज–पुरवठा वाढणार**—ट्रॉम्बे येथें ५०,००० किलोवॅट वीज उत्पादनाचा आणखी एक सेट बसविण्यास मुंबई सरकारनें टाटा कंपनीला परवानगी दिली आहे. पहिला ५०,००० किलोवॅटचा सेट सध्यां उभारण्यांत येत आहे, तो १९५६ अखेर वीज पुरवूं लागेल व त्याचे पाठोपाठ सुमारें आठ महिन्यांनीं दुसरा सेटहि काम करूं लागेल. कोयना योजना पुरी होईपर्यंत वाट पहावयाची असती, तर विजेचें दुर्भिक्ष्य तीव्रतेनें जाणवेल. म्हणून ही योजना आहे.

**श्री. शंतनुराव किर्लोस्कर रशियाला जाणार**—रशियांतील शेतीच्या व उद्योगधंद्यांच्या प्रगतीची पहाणी करण्यासाठीं भारत सरकार १४ सभासदांचें एक मंडळ रशिआला पाठवीत आहे. एक महिना रशिआंत हिंडून हें मंडळ पोलंडला भेट देऊन तेथें पंधरा दिवस राहील. मंडळाचें नेतृत्व श्री. कस्तुरभाई लालभाई ह्यांचेकडे असून श्री. शंतनुराव किर्लोस्कर हे त्या मंडळाचे एक सभासद आहेत.

हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.